प्रेसनोट दिनांक १४/०२/२०२४

# शहर गुन्हे शाखेकडुन, मोटार सायकल चोरीचे ०४ गुन्हे उघडकीस

---

**अ)** सोलापुर शहरातील मोटार सायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणणेकामी, शहर गुन्हे शाखेचे स.पो.नि/ विजय पाटील व त्यांचे तपास पथक हे, सोलापुर शहर परिसरात, मोटार सायकल चोरीचे गुन्हेगारांचा शोध घेत होते. दि.१३/०२/२०२४ रोजी, सपोनि/विजय पाटील व त्यांचे तपास पथकास बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, सोलापुर ते देगांव रोडवरील मारुती मंदीराचे पाठीमागे, सोलापुर येथे एक इसम चोरीचे मोटार सायकल विक्री करीता घेवुन थांबला आहे. अशी बातमी मिळाल्याने, बातमीच्या ठिकाणी जावुन, स.पो.नि/विजय पाटील व त्यांचे तपास पथकाने इसम नामे - नितीन रमेश गुंड, वय-३९ वर्ष, रा.विरवडे, ता.मोहोळ, जि.सोलापुर यास सापळा लावुन ताब्यात घेतले.

त्यानंतर, इसम नामे- नितीन रमेश गुंड याचेकडे स.पो.नि/विजय पाटील व त्यांचे तपास पथकाने कौशल्यपुर्वक तपास केला असता, नमुद आरोपीने सोलापुर शहरातील ०१ मोटार सायकल तसेच ०१ मंगळवेढा येथुन व ०१ इंदापुर, जि.पुणे येथुन अश्या एकुण ०३ मोटार सायकली चोरी केल्याची कबुली दिली. नमूद इसमाकडून, १,३०,०००/- रुपये किंमतीचा एकूण ०३ मोटार सायकली जप्त करण्यात आले आहेत.

**ब)** तसेच दि.११/०२/२०२४ रोजी, सपोनि/विजय पाटील व त्यांचे तपास पथकास, बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, इसम नामे - महेश मार्तंड मिसालोलु, वय-२९ वर्ष, रा.घर नं.४८ मोदी हुडको, सोनी नगर, समाज मंदीर जवळ, सोलापुर हा, चोरीची ॲक्टीव्हा मोटार सायकल वापरत आहे. नमूद इसमास मोदी बोगद्याजवळील रोडवर सापळा लावुन ताब्यात घेतले. त्यावेळी, त्याचेकडे ॲक्टीव्हा गाडीबाबत तपास केला असता, त्याने सदरची ॲक्टीव्हा गाडी चोरी केल्याची कबुली दिली. त्याप्रमाणे त्याचेकडुन ०१ ॲक्टीव्हा गाडी किंमत - २०,०००/- रुपये किंमतीचा मुददेमाल हस्तगत केला.

अशा प्रकारे, खालीलप्रमाणे ०४ मोटार सायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आलेले असून, त्यामध्ये, एकूण १,५०,०००/- रूपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करणेत आला आहे.

| अ.क्रं. | पोलीस ठाणे | गुरनं/कलम | मो.सायकल क्रमांक | किंमत |
|---|---|---|---|---|
| 01 | विजापुर नाका | 61/2024, भा.द.वि. 379 | MH42BA1139 | 50,000/- |
| 02 | विजापुर नाका | 432/2021 भा.द.वि. 379 | MH13DK2262 | 20,000/- |
| 03 | मंगळवेढा पो.स्टे सोलापुर ग्रामीण | 952/2022 भा.द.वि. 379 | MH13DW6477 | 60,000/- |
| 04 | इंदापुर पो.स्टे पुणे ग्रामीण | 795/2022 भा.द.वि. 379 | MH42AT4112 | 20,000/- |

सदरची कामगिरी, मा. श्री. एम. राज कुमार, पोलीस आयुक्त, सोलापुर शहर, डॉ. दीपाली काळे, पोलीस उप- आयुक्त गुन्हे, श्रीमती प्रांजली सोनवणे, सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री सुनिल दोरगे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली, सपोनि/ विजय पाटील, व पथकातील पोलीस अंमलदार राहुल तोगे, आबाजी सावळे, विठ्ठल यलमार, अजिंक्य माने, धिरज सातपुते, यानी केली आहे.

पोलीस आयुक्त सोलापूर शहर
यांचे करीता

Scanned with CamScanner

